संक्षिप्त

क्रिकेट : द. आफ्रिकेची आयर्लंडवर मात

अबुधाबी : रियान रिकेल्टन (७६) व रीझा हेंड्रिक्स (५१) यांच्या अर्धशतकांच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने आयर्लंडवर पहिल्या ट्वेन्टी-२० सामन्यात आठ गडी राखून विजय मिळवला. आयर्लंडने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद १७१ धावा केल्या. त्याच्या प्रत्युत्तराय दक्षिण आफ्रिकेने १८व्या षटकांत २ बाद १७४ धावा करत विजय नोंदवला. रिकेल्टनने आपले पहिले अर्धशतक अवघ्या ३० चेंडूंत पूर्ण केले. त्याने आपल्या खेळीत तीन चौकार व सहा षटकार झळकावले.

फुटबॉल : भारतीय संघ अंतिम फेरीत

थिम्पू : भारताने चुरशीच्या उपांत्य सामन्यात नेपाळला ४-२ अशा फरकाने पराभूत करत 'सॅफ' १७ वर्षांखालील फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. पहिल्या सत्रात एकही गोल झाला नाही. भारताकडून विशाल यादवने (६१व्या मिनिटाला व ६८व्या मि.) सात मिनिटांच्या अंतराने दोन गोल झळकावले. यानंतर ऋषि सिंहने (८५व्या मि.) तिसरा गोल केला. हेमनेईचुंग लुनकिन भरपाई वेळेत गोल झळकावत भारताचा विजय निश्चित केला.

फुटबॉल : भारतासमोर लाओसचे आव्हान

विएन्तियाने : इराणकडून पराभूत झाल्यानंतर भारतीय फुटबॉल संघाला 'एएफसी' २० वर्षांखालील आशिया चषकाच्या मुख्य स्पर्धेत स्थान मिळवण्यासाठी रविवारी पात्रता सामन्यात लाओसविरुद्ध चांगली कामगिरी करावी लागेल. भारतीय संघ गुणतालिकेत इराणनंतर दुसऱ्या स्थानावर आहे. प्रत्येक गटातील शीर्ष संघांसह दुसऱ्या स्थानी राहणाऱ्या संघांतील पाच संघ मुख्य स्पर्धेसाठी पात्रता मिळवतील. मुख्य स्पर्धेचे आयोजन पुढील वर्षी चीन येथे होणार आहे.

दुसऱ्या दिवशीही पावसाचा व्यत्यय

एकही चेंडू न टाकता खेळ रद्द

पीटीआय, कानपूर

भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी पावसाच्या संततधारेमुळे एकही चेंडू न टाकता दिवसाचा खेळ रद्द करावा लागला. सकाळच्या सत्रात पावसाचे प्रमाण कमी होते. मात्र, त्यानंतर पावसाचा वेग वाढला. त्यामुळे ग्रीन पार्क स्टेडियमवर दुसऱ्या दिवशी खेळ झालाच नाही. जवळपास ११.३०च्या सुमारास काही काळ पावसाने विश्रांती घेतल्यानंतर मैदान चांगल्या स्थितीत आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. मात्र, अपुऱ्या प्रकाशामुळे अखेर अधिकृतरीत्या दुपारी सव्वा दोन वाजता खेळ रद्द करण्यात आला.

हवामान खात्यानुसार रविवारीही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मात्र, सोमवार आणि मंगळवारी परिस्थिती चांगली राहण्याची शक्यता आहे. सध्याची स्थिती पाहता सामना अनिर्णीत राहण्याची शक्यता अधिक आहे. पहिल्या दिवशी बांगलादेशने ३ बाद १०७ धावा केल्या. पावसामुळे त्या दिवशी केवळ ३५ षटकांचाच खेळ होऊ शकला. भारताचा वेगवान गोलंदाज आकाश दीपने बांगलादेशचा सलामीवीर झाकिर हसन व शादमान इस्लाम यांना बाद केले. तर, रविचंद्रन अश्विनने कर्णधार नजमुल हुसैन शांतोला माघारी धाडले. भारताने दोन सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना २८० धावांनी जिंकला आहे. त्यामुळे यजमानांकडे मालिकेत १-० अशी आघाडी आहे.

हे सुवर्ण यश भविष्यात असेच कायम राहील!

भारतीय महिला बुद्धिबळ संघाचे प्रशिक्षक अभिजित कुंटे यांचा विश्वास

लोकसत्ता क्रीडा प्रतिनिधी

पुणे : भारताने बुद्धिबळ खेळात एक नवी उंची गाठली आहे. हंगेरीत झालेल्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडने हे सिद्ध केले आहे. भारताच्या पुरुष आणि महिला अशा दोन्ही संघांनी सुवर्णपदकांची कमाई केली. हे सुवर्णयश आता भविष्यात असेच कायम राहील, असा विश्वास भारतीय महिला संघाचे प्रशिक्षक ग्रँडमास्टर अभिजित कुंटे यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आणि सुदैवाने महाराष्ट्रातील खेळाडूंच्या उपलब्धतेचे औचित्य साधून शनिवारी भारतीय संघाच्या सुवर्ण यशात महत्त्वाचा वाटा असणाऱ्या ग्रँडमास्टर विदित गुजराथी आणि प्रशिक्षक अभिजित कुंटे यांचा संघटनेच्या वतीने अध्यक्ष परिणय फुके आणि वरिष्ठ उपाध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. यावेळी विदितला तीन लाख, तर प्रशिक्षक कुंटे यांना दीड लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे आंतरराष्ट्रीय मास्टर दिव्या देशमुख आभासी पद्धतीने या गौरव सोहळ्याला उपस्थित होती.

भारतीय संघाने २६ वर्षांनी दोन्ही विजेतीपदे मिळवून देदीप्यमान कामगिरी केली. संघातील द्रोणावल्ली आणि विदित वगळल्यास सर्वच खेळाडू वयाने लहान होते. खेळाला वयाची अट नसते हेच भारतीय खेळाडूंनी दाखवून दिले. या प्रत्येक खेळाडूचा आत्मविश्वासाचा स्तर कमालीचा उंचावलेला होता ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे, असे सांगून कुंटे यांनी बुद्धिबळाची धुरा आता या नव्या पिढीच्या हातात आहे आणि ती यशस्वी करण्याची क्षमता या प्रत्येकामध्ये आहे असे सांगून खेळाडूंचे कौतुक केले.

कुंटे यांच्यापूर्वी सत्काराला उत्तर देताना विदितने आम्हाला विजेतेपद मिळाले आहे हे अजून खरे वाटत नाही. इतके हे यश मोठे आहे. एक नाही, तर दोन्ही संघांनी हे सुवर्णयश मिळवले. या विजेतेपदात आपण योगदान देऊ शकलो याचा अभिमान वाटत असल्याचे त्याने सांगितले. ''इतके मोठे यश एका रात्रीत मिळत नाही. त्यासाठी मेहनत, तपस्या, त्याग आणि पाठिंबा या प्रत्येकाची गरज असते. खेळाडू म्हणून मी मेहनत घेतली. मला कुटुंबीयांकडून मिळालेला पाठिंबा विसरू शकणार नाही. मला घडवताना त्यांना अनेक गोष्टींचा त्याग करावा लागला. त्यांच्या त्यागाचे मोल असे मोजता येणार नाही. पण, त्यांच्या पाठिंब्याशिवाय मी उभाच राहू शकलो नसतो,'' असे विदित म्हणाला.

''अभिजित कुंटे प्रशिक्षक असले, तरी माझ्यासाठी सुरुवातीपासून ते प्रेरणास्थान आणि गुरू राहिले आहेत. वेळोवेळी मला त्यांनी मार्गदर्शन केले आहे. ते माझ्या पाठीशी उभे असतात. मला घडविण्यात त्यांचाही वाटा राहिला आहे,'' असे विदितने सांगितले.

अखेर स्वप्न साकार

खेळाडू म्हणून १९९८ मध्ये मी रशियात ऑलिम्पियाड स्पर्धेत खेळलो होतो. तेव्हा भारतीय संघ ३५व्या स्थानी राहिला होता. त्यावेळी आयुष्यात ऑलिम्पियाड विजेतेपदाचे स्वप्न हे स्वप्नच राहणार असे वाटत होते. पण, सुदैवाने आज प्रशिक्षक म्हणून हे स्वप्न साकार झाले. यात सर्वाधिक वाटा युवा खेळाडूंचा होता. एक प्रशिक्षक या नात्याने योगदान देता आले याचा मला अभिमान वाटतो, असे अभिजित कुंटे यांनी सांगितले.

'आयसीसी' बैठकांसाठी 'बीसीसीआय' प्रतिनिधी निवडण्यास प्राधान्य

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा आज

पीटीआय, बंगळूरु

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) आज, रविवारी होणाऱ्या वर्षिक सर्वसाधारण सभेमध्ये (एजीएम) आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) बैठकींसाठी भारताच्या दोन प्रतिनिधींची निवड करण्याला प्राधान्य असेल. मात्र, जय शहा यांच्या जागी नवीन सचिव निवडण्याचा कुठलाच प्रस्ताव सभेच्या कार्यक्रमात नाही.

महिलांच्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेनंतर दुबईत 'आयसीसी'चे कॉनक्लेव होणार असल्याने ही सभा महत्त्वपूर्ण आहे. महिलांच्या ट्वेन्टी-२० विश्वचषकाचा अंतिम सामना २० ऑक्टोबरला दुबई येथे होणार आहे आणि तोपर्यंत शहा हे 'बीसीसीआय'च्या सचिवपदी कायम राहतील. ते १ डिसेंबरपासून 'आयसीसी'च्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळतील. 'बीसीसीआय'चे अध्यक्ष म्हणून सौरव गांगुली यांचा कार्यकाळ संपल्यानंतर शहा 'आयसीसी'च्या बैठकांमध्ये भारताचे प्रतिनिधी म्हणून जात होते. 'बीसीसीआय'चे सध्याचे अध्यक्ष रॉजर बिन्नी 'आयसीसी'च्या बैठकांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करु शकतात. मात्र, आतापर्यंत तसे झालेले नाही. त्यांच्या कार्यकाळासाठी एक वर्षांचा कालावधी शिल्लक असून ते पर्यायी संचालक म्हणून कायम राहतात की त्यांच्या जागी अजून कोणाची निवड केली जाईल, हे या सभेत कळेल.

सभेच्या कार्यक्रमात सचिवपदाच्या निवडीचा मुद्दा नाही. मात्र, आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जवळ असणाऱ्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीच्या नवीन संकुलाच्या उद्घाटनप्रसंगी एकत्रित झालेले सर्व सदस्य याबाबत चर्चा करू शकतात. गुजरात क्रिकेट संघटनेचे सचिव अनिल पटेल व दिल्ली आणि जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष रोहन जेटली यांच्या नावाचा सचिवपदासाठी केला जाऊ शकतो. सचिवपदाच्या शर्यतीत पटेल पुढे असल्याचे कळते आहे. या बैठकीत भारतीय क्रिकेटर्स संघटनेचे प्रतिनिधी आणि सर्वसाधारण सभेतून दोघांना सहभागी करून घेणे, उप समितींची नियुक्ती आणि २०२४-२५ च्या वार्षिक अर्थसंकल्पाला मंजुरी देणे या मुद्द्यांचाही समावेश आहे.

महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद, जि. सातारा

वशी क्र.: २४/७ *दिनांक : २७/०९/२०२४*

ई-निविदा सूचना

महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद हद्दीमधील विविध विकास कामांच्या ई-निविदा सूचना महाराष्ट्र शासनाच्या *https://mahatenders.gov.in* या संकेतस्थळावर दिनांक - ३०/०९/२०२४ पासून प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

सही/-
(योगेश पाटील)
प्रशासक तथा मुख्याधिकारी
महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद
महाबळेश्वर

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, जळगांव

जाहीर ई-निविदा सुचना क्रमांक-जळगांव ४८/२०२४-२०२५

जळगांव जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजना-३ **संशोधन व विकास (R&D)** अंतर्गत रस्ते दर्जोन्नती व ५ वर्षे देखभाल दुरूस्तीच्या एकुण ०४ पॅकेजेस (१५ कामे, एकुण अंदाजित किंमत रक्कम रू. ६७८८.३० लक्ष) ई-निविदा मागविण्यात येत आहे.

सदर कामांची बी-१, ई-निविदा **https://www.mahatenders.gov.in** या वेबसाईटवर **दि. ३०/०९/२०२४** पासुन उपलब्ध होईल.

ई-निविदा सुचना क्र.	एकुण कामे	एकत्रित अंदाजित किंमत
४८/२०२४-२०२५	१५	रू. ६७८८.३० लक्ष

सही/- **(संजय राठोड)**
कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, जळगांव

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, जळगांव

जाहीर ई-निविदा सुचना क्रमांक-जळगांव ४४ ते ४७/२०२४-२०२५

जळगांव जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजना-३ **संशोधन व विकास (R&D)** अंतर्गत रस्ते दर्जोन्नती व ५ वर्षे देखभाल दुरूस्तीच्या एकुण ०४ पॅकेजेस (२१ कामे, एकुण अंदाजित किंमत रक्कम रू. ७१४४.३४ लक्ष) ई-निविदा मागविण्यात येत आहे.

सदर कामांची बी-१, ई-निविदा **https://www.mahatenders.gov.in** या वेबसाईटवर **दि. ३०/०९/२०२४** पासुन उपलब्ध होईल.

ई-निविदा सुचना क्र.	एकुण कामे	एकत्रित अंदाजित किंमत
४४ ते ४७/२०२४-२०२५	२१	रू. ७१४४.३४ लक्ष

सही/- **(संजय राठोड)**
कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, जळगांव

अपघातानंतर मुशीरची प्रकृती स्थिर

लखनऊ : मुंबईचा अष्टपैलू मुशीर खानची तब्येत लखनऊच्या बाहेरील परिसरात झालेल्या अपघातानंतर स्थिर आहे. मात्र, आगामी इराणी चषकासह सुरू होणाऱ्या क्रिकेट हंगामापासून बराच काळ दूर राहण्याची शक्यता आहे. १९ वर्षीय मुशीरच्या मानेला दुखापत झाली आहे. त्यामुळे कमीत कमी तीन महिने त्याला क्रिकेट खेळता येणार नाही. त्यामुळे ११ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या रणजी करंडकच्या २०२४-२५ हंगामाच्या सुरुवातीच्या सामन्यांकरिता तो मुंबई संघातून बाहेर झाला आहे.

मुशीर १ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या इराणी चषकासाठी आजमगड येथून लखनऊला जात होता. मात्र, त्याची गाडी दुभाजकाला आदळल्याने अपघात झाला. मुशीरचे वडील नौशाद खानही त्याच्यासोबत होते. त्यांना पूर्वांचल एक्स्प्रेसवे येथे झालेल्या या दुर्घटनेत फारशी दुखापत झालेली नाही. लखनऊच्या मेदांता रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. भोला सिंह यांनी मुशीरला कोणताही धोका नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. ''पूर्वांचल एक्स्प्रेसवेवर झालेल्या अपघातात जखमी झालेल्या क्रिकेटपटू मुशीर खानला मानेच्या दुखापतीमुळे मेदांता रुग्णालयाच्या आपत्कालीन विभागात आणण्यात आले. त्याच्यावर अस्थिरोग विभागाचे संचालक डॉ. धर्मेंद्र सिंह यांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. सध्या त्याची तब्येत स्थिर असून त्याच्या जिवाला कुठलाही धोका नाही,'' असे रुग्णालयाच्या निवेदनात म्हटले आहे.

ट्रीसा-गायत्री जोडी पराभूत

मकाव : ट्रीसा जॉली व गायत्री गोपीचंद या महिला दुहेरी जोडीला मकाव खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत (सुपर ३०० दर्जा) सीह पेइ शॅन व हुंग एन जू या चायनीज तैपेई जोडीकडून उपांत्य सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. ट्रीसा व गायत्री या जोडीच्या पराभवामुळे भारताचे स्पर्धेतील आव्हानही संपुष्टात आले आहे.

तिसऱ्या मानांकित भारतीय जोडीने चायनीज तैपेईच्या जोडीकडून तीन गेमपर्यंत चाललेल्या सामन्यात १७-२१, २१-१६, १०-२१ असे पराभूत व्हावे लागले. जागतिक क्रमवारीत २३ व्या स्थानी असणाऱ्या ट्रीसा व गायत्री जोडीचा चायनीज तैपेईच्या जोडीविरुद्धचा वर्षातील तिसरा पराभव आहे.

'एआयटीए'ची निवडणूक बिनविरोध, पण घोषणा गुलदस्त्यात

नवी दिल्ली : अखिल भारतीय टेनिस महासंघाची (एआयटीए) निवडणूक शनिवारी बिनविरोध पार पडली. मात्र, महासंघाकडून क्रीडा आचारसंहितेचे उल्लंघन झाल्या प्रकरणातील एक याचिक उच्च न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे नव्या कार्यकारिणीची घोषणा गुलदस्त्यातच ठेवावी लागली.

'एआयटीए'च्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ही निवडणूक होणार होती. मात्र, प्रत्येक पदासाठी केवळ एकच अर्ज आल्यामुळे मतदानाची गरजच पडली नाही. यामध्ये अध्यक्ष, सरचिटणीस, कोषाध्यक्ष, आठ उपाध्यक्ष, चार सहसचिव आणि १० कार्यकारी सदस्य अशा कार्यकारिणीचा समावेश आहे.

श्रीलंकेची सामन्यावर पकड

गॉल : श्रीलंकेने दुसऱ्या क्रिकेट कसोटीच्या तिसऱ्या दिवशी दुसऱ्या डावात न्यूझीलंडची अवस्था फॉलोऑननंतर ५ बाद १९९ अशी बिकट केली. त्यामुळे श्रीलंकेला विजयासाठी पाच गडी बाद करण्याची आवश्यकता आहे. श्रीलंकेने या लढतीत विजय नोंदवल्यास दोन सामन्यांच्या मालिकेत ते निर्भेळ यश मिळवतील. न्यूझीलंडचा संघ अजून श्रीलंकेच्या पहिल्या डावाच्या ३१५ धावांनी पिछाडीवर आहे. सामना तीन दिवसात संपण्याची चिन्हे होती मात्र, अपुऱ्या प्रकाशामुळे पंचांनी दिवसाची २० षटके शिल्लक असताना दिवसाचा खेळ थांबवण्याचा निर्णय घेतला. तिसऱ्या दिवसअखेर टॉम ब्लंडेल (४७) व ग्लेन फिलिप्स (३२) हे मैदानावर होते. दोघांनीही सहाव्या गड्यासाठी ७८ धावांची भागीदारी रचली.

तिसऱ्या दिवशी न्यूझीलंडचे १३ फलंदाज बाद झाले. न्यूझीलंडने दिवसाच्या सुरुवातीला पहिल्या डावात २ बाद २२ धावांच्या पुढे खेळण्यास सुरुवात केली. मात्र, त्यांच्या फलंदाजांना टिकून खेळता न आल्याने त्यांचा पहिला डाव ८८ धावांवर आटोपला. त्यामुळे फॉलोऑनची नामुष्की न्यूझीलंडवर ओढवली. न्यूझीलंडने दुसऱ्या डावात सलामीवीर टॉम लॅथमला (०) गमावले. त्याला फिरकीपटू निशान पेइरिसने (३/९१) बाद केले. यानंतर डेव्हॉन कॉन्वे (६१) व कर्णधार केन विल्यम्सन (४६) यांनी दुसऱ्या गड्यासाठी ९७ धावा जोडल्या. पेइरिसने विल्यम्सन व रचिन रवींद्रला (१२) बाद करत न्यूझीलंडची अवस्था ५ बाद १२१ अशी केली.

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नाशिक

जाहिर ई-निविदा सुचना क्रमांक - नाशिक ०९/२०२४-२५

नाशिक जिल्ह्यातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजना-३ बॅच-१ (२०२४-२५) अंतर्गत रस्त्यांच्या एकुण ०९ पॅकेजेसची १० कामे, (बी-१) ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

सदर कामांची ई-निविदा **https://www.pmgsytenders.gov.in** या वेबसाईटवर **दि. ३०/०९/२०२४** पासुन उपलब्ध होईल.

सही/-
(व्ही.आर.पाटील)
कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना,
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नाशिक

मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

सार्वजनिक बांधकाम विभाग

जाहीर निविदा सुचना क्र.०३/२०२४-२५

मा. आयुक्त तथा प्रशासक मालेगाव महानगरपालिका, हे सार्वजनिक बांधकाम विभागा कडील **" महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजने अंतर्गत"** मौसम नदीवर नोमानी पुल बांधणे, या कामाची निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन पध्दतीने) मागवित आहे. सदर निविदा सुचना मा. शासनाच्या https//www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. निविदा सुचनेत कामासंबंधी संपुर्ण माहिती, अटी शर्ती, निविदा प्रपत्र विक्री, दाखल करणेचा दिनांक, निविदा उघडणे इ. माहिती वरील संकेतस्थळावर दिनांक: २७/९/२०२४ दुपारी १५.०० वाजेपासुन ते दिनांक ५/१०/२०२४ सायंकाळी १७.०० वाजे पर्यंत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर कामासाठी आवश्यक ती माहिती उप अभियंता सा.बांध विभाग, म.न.पा मुख्य कार्यालय यांचे कडुन प्राप्त करता येईल. ई-निविदा क्रमांक: ०१ ते ०१

आयुक्त तथा प्रशासक
मालेगाव महानगर पालिका, मालेगाव

TATA MOTORS PASSENGER VEHICLE LTD.
CHIKHALI, PUNE : 411 062.

SCRAP FOR SALE DATED 02.10.2024

Arising Lots (1st Oct. to 31st Dec. 24) - MS Offcut (5000MT), Fasteners (100 MT) etc.

Arrange Lots - M.S Offcut, Alu. blocks etc.

Hazardous Lots - E-waste. (Party must possess Current & Valid CPCB Registration / Passbook and MPCB "Consent to operate/Hazardous Waste Authorization)".

Machine Lots - Storage racking system, Battery tools, etc.

NOTE : 1) Demand Draft for Earnest Money Deposit (EMD) to be drawn on Nationalized Bank only. 2) Refer tender form for description, EMD amount & other details,

Inspection : From 1st Oct. & 2nd Oct. 24 between 01:00 PM to 3:30 PM. Helpdesk: 8237004958 / 020-66133621, e-mail - vijay.ranjan@tatamotors.com

Tender Submission Date : Strictly on or before 02nd Oct. 24 up to 4.00 pm. Please note, wearing of Flat Sole Leather Shoes at the time inspection is mandatory.

TATA

MR. VIJAY RANJAN
SECRETARY SDC

प्रत्यक्ष ताबा सूचना

ICICI Home Finance

नोंदणीकृत कार्यालयः आयसीआयसीआय बँक टॉवर्स, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - 400051
कॉर्पोरेट कार्यालयः आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी कुर्ला रोड, जेबी नगर, अंधेरी पूर्व, मुंबई इ 400 059.
शाखा कार्यालयः दुसरा मजला, कार्यालय क्र. 201-202, साई मिडास, पटियाला हाऊस समोर, नगर मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर - 414003.

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13 (12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत, खाली नमूद केलेल्या कर्जदारांना मागणी सूचना पाठवली ज्यात त्यांना सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत सूचनेमध्ये नमूद रकमेचा भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे. कर्जदार व सर्वसामान्य जनतेस याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या रकमेच्या भाराधीन असेल.

अ. क्र.	कर्जदार यांचे नाव/ कर्ज खाते क्रमांक	मालमत्तेचे वर्णन ताबा दिनांक	मागणी सूचना दिनांक/ मागणी सूचनेतील रक्कम (रु.)	शाखेचे नाव
1	आतिफ अस्लम इनामदार (कर्जदार), अस्लम रज्जक इनामदार (सह-कर्जदार), LHADR00001477761	रो हाऊस क्र. 4, मोजमाप 42.75 चौ. मी., सोबत त्यावरील इमारत, नागरदेवळे अहमदनगर 232 1 बी 2बी 2ए1 अहमदनगर महाराष्ट्र 414002. (संदर्भ कर्ज खाते क्र. Lhadr00001477761) चतुःसीमा पुढीलप्रमाणे : उत्तर : रो हाउस क्र. 5, दक्षिण : रो हाउस क्र. 3, पूर्व : 6 मी. रस्ता, पश्चिम : स. क्र. 2 चा उर्वरित भाग. **ताबा दिनांकः 25-सप्टेंबर-24**	**20-09-2023** **रु. 1360063/-**	**अहमदनगर**

वर नमूद केलेल्या कर्जदार / जमीनदारांना याद्वारे रक्कम परत करण्यासाठी 30 दिवसांची सूचना देण्यात येत आहे, अन्यथा सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम 2002 च्या नियम 8 आणि 9 अंतर्गत तरतुदींनुसार ही सूचना प्रकाशित झाल्यापासून 30 दिवसांच्या समाप्तीनंतर तारण ठेवलेल्या मालमत्तेची विक्री केली जाईल.

दिनांकः 29.09.2024, ठिकाणः अहमदनगर-ब **प्राधिकृत अधिकारी, आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

जाहीर सूचना

ICICI Home Finance

नोंदणीकृत कार्यालय : आयसीआयसीआय बँक टॉवर्स, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - 400051.
कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी कुर्ला रोड, जे.बी. नगर, अंधेरी (पू.), मुंबई - 400 059.
शाखा कार्यालय : दुसरा मजला, कार्यालय क्र. 201-202, साई मिडास, पटियाला हाऊस समोर, नगर मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर - 414003.

खालील कर्जदारांनी आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड ("आयसीआयसीआय एचएफसी") कडून मिळवलेल्या कर्ज सुविधेची मुद्दल आणि व्याजाची परतफेड करण्यात चूक केली आहे आणि त्यांची कर्जे अनुत्पादित मत्ता (एनपीए) म्हणून वर्गीकृत केली गेली आहेत. सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 च्या कलम 13 (2) अंतर्गत त्यांना त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यांवर सूचना बजावण्यात आली होती, तथापि त्यांना त्याची सेवा झाली नाही आणि म्हणून त्यांना या जाहीर सूचनेद्वारे सूचित केले जाते.

अ. क्र.	कर्जदाराचे / सह-कर्जदाराचे नाव / कर्ज खाते क्रमांक	अंमलबजावणी करावयाचा अनामत मत्तेच्या मालमत्तेचा पत्ता	मागणी सूचनेचा दिनांक / मागणी सूचनेतील रक्कम (रु.)	शाखेचे नाव
१	संदीप अशोक खरात (कर्जदार), रेखा पेत्रस शिनगारे (सह-कर्जदार), सी ओ जाधव सूर्यकांत दादा, प्लॉट क्र. 24, एसआर क्र. 226, कॉटेज कॉर्नर, यशवंतराव चौहान फार्मसी कॉलेज जवळ, सावेडी, अहमदनगर अहमदनगर महाराष्ट्र 414003. LHADR00001246151.	फ्लॅट क्र. 202, दुसरा मजला, मोजमाप 24.73. चौ. मी., माऊली अपार्टमेंट, प्लॉट क्र. 55 56 57 नवनागापूर एमआयडीसी जवळ 111 1 2, एस क्र. 88/2/110 आणि 1ए 110 1बी 1 2 3 4 110 2 अहमदनगर महाराष्ट्र 414001. चतुःसीमा :- उत्तर : बिल्डिंग सेट बॅक, दक्षिण : सामायिक जिना क्र. 3, पूर्व : फ्लॅट क्र. 203, पश्चिम : फ्लॅट क्र. 201.	14-09-2024' रु. 590,534.1	3-सप्टें.-24
२	सचिन भरत काशीद (कर्जदार), रेणुका सचिन काशीद (सह-कर्जदार), आझाद चौक बुरुड, गल्ली राहुरी बीके, अहमदनगर राहुरी महाराष्ट्र 413705. LHADR00001404664	जमीन संबंधित सीटीएस क्र. 2431, मोजमाप 95.10 चौरस मीटर, सोबत त्यावरील बांधकाम, मालमत्ता क्र. W21000093, आझाद चौकाजवळ, मौजे राहुरी बु., अहमदनगर, सीटीएस क्र 2431, राहुरी महाराष्ट्र 413705. चतुःसीमा :- उत्तरः खुली जागा, दक्षिणः रस्ता, पूर्वः सीटीएस क्रमांक 2432 आणि रस्ता, पश्चिमः रस्ता.	14-09-2024' रु. 7,60,001.8	3-सप्टें.-24
3	भूषण आदिनाथ जाधव (कर्जदार), मीरा आदिनाथ जाधव (सह-कर्जदार), नाथनगर पाथर्डी अहमदनगर महाराष्ट्र 414601. LHADR00001462553.	रो ब्लॉक क्र. 2, मोजमाप 49.31 चौ. मी., गट क्रमांक 6, वैष्णवी पार्क, शेंडी, जि. अहमदनगर, अहमदनगर महाराष्ट्र 414601. चतुःसीमा :- उत्तर : रस्ता, दक्षिण : गट क्रमांक पैकी, पूर्वः रो ब्लॉक क्रमांक 1, पश्चिमः रो ब्लॉक क्रमांक 3.	19-09-2024' रु. 9,68,801.68	8-सप्टें.-24

सुचनेच्या बदली सेवेसाठी पावले उचलली जात आहेत. वरील कर्जदार आणि / किंवा त्यांच्या जामीनदारांना (लागू असल्याप्रमाणे) सल्ला देण्यात येत आहे कि, या सुचनेच्या प्रकाशन तारखेपासून 60 दिवसांच्या आत थकबाकीची देयके द्यावीत, अन्यथा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 नुसार पुढील पावले उचलली जातील.

दिनांकः 29.09.2024 स्थानः अहमदनगर **प्राधिकृत अधिकारी, आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

ICICI Home Finance

कॉर्पोरेट ऑफिसः आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी - कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई- 400059, भारत
शाखा कार्यालयः दुसरा मजला, कार्यालय क्र. 203, साई मिडास, पटियाला हाऊस समोर, नगर, मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर-414003

स्थावर मालमत्तेची खाजगी कराराद्वारे विक्रीसाठी सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9 (1) सह वाचलेल्या नियम 8(8) सह वाचलेल्या सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ?सेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत स्थावर मालमत्तेची खाजगी कराराद्वारे विक्रीसाठी सूचना

आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड (आयसीआयसीआय एचएफसी) यांनी खाली नमूद केलेल्या तारण मालमत्तेच्या विक्रीसाठी अनेक ई-लिलाव आयोजित केले, तथापि, ते सर्व ई-लिलाव अयशस्वी झाले. आता, रु. 13,00,000/- च्या रकमेसाठी उक्त मालमत्ता खरेदी करण्याच्या ऑफरसह इच्छुक खरेदीदाराने आयसीआयसीआय एचएफसीशी संपर्क साधला आहे. याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे तारण / भारग्रस्त आहे, या मालमत्तेचा ताबा आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारयाने घेतला आहे आणि या मालमत्तेची विक्री येथे दिलेल्या संक्षिप्त तपशीलानुसार खाजगी कराराद्वारे 'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'तेथे जे काही आहे' या तत्वावर विक्री केली जाईल.

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार/कायदेशीर वारस यांचे नाव, कर्ज खाते क्र.	ज्ञात भारांसह असल्यास, सुरक्षित मालमत्तेचे तपशील	थकबाकी रक्कम	राखीव किंमत ---------- बयाणा रक्कम	मालमत्ता पाहणीचा दिनांक आणि वेळ	लिलाव दिनांक आणि वेळ	लिलाव दिनांकाच्या एक दिवस आधी	सरफेसी टप्पा
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(इ)	(एफ)	(एच)	(आय)	(जे)
1	सोमनाथ बाळू जाधव (कर्जदार) अर्चना सोमनाथ जाधव (सह-कर्जदार) LHADR00001271947 आणि NHADR00001273876	प्लॉट क्र. 66 ते 68/1, स. क्र. 88/2/11/1ए/1बी/1 ते 4/110 //2/11/1/2 येथील रो हाऊस, साईराज नगर नवनागापूर, अहमदनगर- 414111	रु. 14,80,376.18 26 सप्टेंबर, 24	रु. 13,00,000/- ---------- रु. 1,30,000/-	09 ऑक्टोबर, 24 स. 11 - दु. 3	16 ऑक्टोबर, 24 दु. 2-दु. 3	15 ऑक्टोबर, 24	प्रत्यक्ष ताबा

ऑनलाइन लिलाव आमच्या लिलाव एजन्सी **मॅटेक्स नेट प्रायव्हेट लिमिटेड** यांची वेबसाइट (यूआरएल लिंक- **https://assets.matexauctions.com**) यावर आयोजित केला जाईल. संभाव्य बोलीदाराने लेखाच्या शीर्षस्थानी नमूद केलेल्या आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) आरटीजीएस / डिमांड ड्राफ्ट (डीडी) (संदर्भ स्तंभ ई) **दि. 15 ऑक्टोबर, 24 रोजी सायं. 04:00 वा. किंवा त्यापूर्वी** सादर करणे आवश्यक आहे. संभाव्य बोलीदारांनी नोंदणी फॉर्म आणि बोलीच्या अटी व शर्तींच्या फॉर्मची स्वाक्षरी केलेली प्रत देखील आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर **दि. 15 ऑक्टोबर, 24 रोजी सायं. 05.00 वा. किंवा त्यापूर्वी** सादर करणे आवश्यक आहे. बयाणा रक्कम ठेव डिमांड ड्राफ्ट (डीडी) **अहमदनगर** येथे देय असलेल्या **"आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड- लिलाव"** च्या नावे राष्ट्रीयकृत / अनुसूचित बँकेकडून देय असावा. सामान्य जनतेला विनंती आहे की त्यांनी वर नमूद केलेल्या इच्छुक खरेदीदाराने देऊ केलेल्या रकमेपेक्षा जास्त बोली सादर करावी. याद्वारे सूचित केले जाते की वर नमूद केलेल्या इच्छुक खरेदीदाराने ऑफर केलेल्या रकमेपेक्षा जास्त बोली आयसीआयसीआय एचएफसी कडे प्राप्त न झाल्यास, तारण असलेली मालमत्ता सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 9 (1) सह वाचलेल्या नियम 8(8) नुसार उक्त इच्छुक खरेदीदाराला विकली जाईल तपासणी, विक्री किंवा बोली सादर करण्याच्या अटी व शर्तींबाबत पुढील कोणत्याही स्पष्टीकरणासाठी, कृपया आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, 9920807300 वर संपर्क साधा. कोणतीही एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय नाकारण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारयाने राखून ठेवला आहे. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया **https://www.icicihfc.com/** ला भेट द्या.

दिनांकः 29.09.2024 | ठिकाणः अहमदनगर प्राधिकृत अधिकारी, आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड | CIN No.: U65922MH1999PLC120106

हे पत्र **वैदेही ठकार** यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, ई -२५, एम.आय.डी.सी.,वाळुंज, छत्रपती संभाजीनगर येथे छापून १६४, अंबर प्लाझा, स्टेशन रोड, अहमदनगर-४१४ ००१ येथे प्रसिद्ध केले. **संपादकीय/ जाहिरात/ वितरण** : १६४, अंबर प्लाझा, स्टेशन रोड, अहमदनगर-४१४ ००१. दूरध्वनी- ०२४१-२४५१९०७, २४५१५४४, फॅक्स : ०२४१-२४५१६०७.
लोकसत्ता कार्यालय : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ केळकर*** (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd. No. MAHMAR/2010/36250

© द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.